




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com








■ वर्ष ७६ वे/अंक ३२८ वा ■ ■ अमरावती,गुरुवार दिनांक १६ जुलै २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २५ आषाढ १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■







# शेतकऱ्यांचे ४८ हजार कोटीचे वीज बिल माफ : मुख्यमंत्री




पंढरपूर दि. १५ : राज्यातील शेतकरी कर्जमाफीच्या घोषणेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बळीराजासाठी आणखी एक मोठा निर्णय घेतलाय. सरकार शेतकऱ्यांच्या साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या शेतीमधील वीज जोडणीचं जुने विजबिलं माफ करणार असल्याची घोषणा केली आहे. शेतीला पाणी देण्यासाठी साडेसात हॉर्स पॉवरचे जे मोटारपंप वापरले जातात त्यांना सध्या बिल येत नाही. मात्र यापूर्वीची जुनी बिलं अजूनही प्रत्येकाच्या नावाने खात्यात जमा आहेत. त्याची वसूली कधीही होऊ शकते.

त्यामुळे शेतकरी दुसरं कुठलंही कनेक्शन घ्यायला गेला तर त्याला ते मिळत नाहीये. परंतु महायुती सरकारने ही ४८ हजार कोटी रुपयांची जुनी बिलं माफ करण्याचा निर्णय घेतलाय. शेतकऱ्याची पाटी कोरी झाली पाहिजे आणि नव्याने त्याला पाटीवर इतिहास लिहता आला पाहिजे, यादृष्टीने आम्ही हा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेतल्याबद्दल भाजपच्या प्रदेश समितीच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभावेळी ते बोलत होते. कर्जमाफी आणि थकीत बिलांच्या मुद्द्यावर मी नेहमीच राज्याच्या आर्थिक शिस्तीबद्दल स्पष्टपणे बोललोय. मात्र आमच्या महायुतीतील काही सहकारी मंडळींनी जेव्हा माझ्याशी याबाबत चर्चा केली. तेव्हा आम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी सरसकट कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला.

पुढे मुख्यमंत्री म्हणाले, जर आम्हाला केवळ आणि केवळ राजकारणच करायचे असतं, तर २०२९ च्या विधानसभा निवडणुकीच्या शेवटी आम्ही कर्जमाफीचा निर्णय घेतला असता. परंतु, आम्ही शेतकऱ्यांच्या हिताच्या आड कधीही राजकारण आणणार नाही. राजकारण आम्ही करूच, ते तर करावंच लागेल, पण बळीराजाच्या जीवावर करणार नाही, असेही (उर्वरित पान २ वर)

## देवाभाऊंनी देशाचे नेतृत्व करावे, आषाढीला आपण पांडुरंगाला साकडं घालू : दत्तात्रय भरणे



राज्यात खांदेपालट होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीत जाणार असल्याच्या चर्चा राज्याच्या राजकारणात सातत्याने होत असतात. मात्र, आता चक्क महायुतीमधील सत्ताधारी मंत्र्यानेच देवभाऊंनी देशाचं नेतृत्व करावं यासाठी आपण पांडुरंगाला साकडं घालू, असे म्हटलं आहे. शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कर्जमाफीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा भाजपच्या किसान मोर्चाच्यावतीने सत्कार आयोजित केला होता. या सत्कार सोहळ्यात बोलताना राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलेल्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आपण पांडुरंगाकडे एकच विनंती करु, विठ्ठलाला साकडं घालू की, योग्यवेळी देवाभाऊंना देशाचे नेतृत्व करण्याची संधी (उर्वरित पान २ वर)

# मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला पाठिंबा देणार असल्याच्या बातम्या निराधार

पुणे दि. १५ आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारकडून संसदेत मांडल्या जाणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पाठिंबा देणार असल्याच्या सर्व चर्चा निराधार आहेत. आमच्याकडे या विधेयकासंदर्भात कोणताही प्रस्ताव आलेला नाही. तसा प्रस्ताव आल्यास आम्ही त्यावर अभ्यास करुन २४ तासांमध्ये भूमिका मांडू, अशी स्पष्टोक्ती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली. त्या बुधवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.



आज सकाळपासून शरद पवारांची राष्ट्रवादी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारची साथ देत मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणार असल्याची जोरदार चर्चा रंगली होती. यामुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीने राज्यात महायुतीसोबत सत्तेत सामील होण्याच्यादृष्टीने आणखी एक पाऊल टाकल्याचे बोलले जात होते. मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला शरद पवार गट पाठिंबा देणार असल्याचे वृत्त सुप्रिया सुळे यांच्या हवाल्याने प्रसिद्ध झाले होते. मात्र, सुप्रिया सुळे यांनी या सगळ्यात कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले. आज सकाळपासून एक जबाबदार वर्तमानपत्र आणि प्रसारमाध्यमांमध्ये काही (उर्वरित पान २ वर)

## डीलिमिटेशन बिलावरून महाविकास आघाडीत मोठी फूट, शरद पवारांनी पाठिंबा देताच राऊत आक्रमक

मुंबई दि. १५ : महाविकास आघाडीत मोठी फूट पडण्याची शक्यता आहे. शरद पवार एनडीएमध्ये दाखल होण्याच्या चर्चा आहेत. तश्या हालचाली सुरू आहेत. त्यातच डीलिमिटेशन बिलावरून महाविकास आघाडीत मोठी फूट पडली. मतदारसंघाच्या पुनर्रचना विधेयावर सुप्रिया सुळे यांनी म्हटले की, ठाकरेंची शिवसेना, डीएमके आणि काँग्रेसचा होकार आहे. शरद पवार यांनी या बिलाला पाठिंबा दिला.



ज्यामुळे ठाकरे गट भडकला आहे. यावरून आता संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला. संजय राऊत यांनी म्हटले की, डीलिमिटेशन बिलाला आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणजे शरद पवारांचा पक्ष आम्ही या बिलाला पाठिंबा देत आहोत, (उर्वरित पान २ वर)

# अखेर अमित शाहांनी शब्द दिला, एकनाथ शिंदेंनी भेट घेताच दिल्लीच्या बैठकीत मिळाले मोठे आश्वासन



नवी दिल्ली दि. १५ : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रात्री (१५ जुलै) दिल्लीच्या दौऱ्यावर असताना केंद्रीय मंत्री अमित शाहा यांची भेट घेतली. शिवसेनेचे नेते तथा खासदार श्रीकांत शिंदे तसेच नुकतेच ठाकरे गटातून आलेले ६ खासदार त्यांच्यासोबत या बैठकीत हजर होते. अमित शाहा आणि शिंदे यांच्यात एकूण ४५ मिनिटे बैठक झाली. या बैठकीत बंद दाराआड वेगवेगळ्या विषयांवर चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. बैठकीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली हे अद्याप समोर आलेले नाही. परंतु मिळालेल्या माहितीनुसार सहा खासदारांना अमित शाहा यांच्याकडून मोठे आश्वासन मिळाल्याचे बोलले जात आहे.

लवकरच केंद्रात मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात खासदार श्रीकांत शिंदे यांना कॅबिनेट मंत्रिपद दिले जाण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या वाट्याला आणखी एक राज्यमंत्रिपदही मिळू शकते. या सर्व चर्चा सुरू असतानाच शिंदे यांनी दिल्लीत अमित (पान २ वर)

## माहोल....




सामान्य माणसाचा गेम होणार आहे असे दिसते आहे...

# फडणवीस सरकारचा लवकरच मंत्रिमंडळ विस्तार, काही मंत्र्यांचा पत्ता कट होण्याची शक्यता

मुंबई दि. १५ : केंद्रातील मोदी सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर आता महाराष्ट्रातही मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे. राज्यातील महायुती सरकारमध्ये लवकरच मंत्रिमंडळ विस्तार आणि खांदेपालट होण्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या आगामी विस्तारात सुमार कामगिरी करणारे आणि वादग्रस्त वक्तव्यांमुळे सरकारची प्रतिमा मलिन करणाऱ्या काही विद्यमान मंत्र्यांना डच्चू दिला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**सुमार कामगिरी करणाऱ्या मंत्र्यांना मिळणार डच्चू**

मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार, महायुतीमधील शिवसेना (शिंदे गट), भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या तिन्ही पक्षांतील अकार्यक्षम आणि वादग्रस्त मंत्र्यांची उचलबांगडी केली जाऊ शकते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीच्या नेत्या सुनेत्रा पवार हे आपापल्या (उर्वरित पान २ वर)

# इंडिया सेमीकंडक्टर मिशन २.० ला मंजुरी, १.२७ लाख कोटींची तरतूद



नवी दिल्ली दि. १५ : भारताला जागतिक स्तरावर इलेक्ट्रॉनिक्स आणि हाय-टेक मॅन्युफॅक्चरिंगचे केंद्र बनवण्यासाठी केंद्र सरकारने आज एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन २.०' ला अधिकृतपणे मंजुरी देण्यात आली आहे.

देशात चिप आणि सेमीकंडक्टर इकोसिस्टमचा पूर्णपणे विकास करण्यासाठी सरकारने तब्बल १.२७ लाख कोटी रुपयांच्या भरीव बजेटची घोषणा केली आहे. यासोबतच, यासोबतच देशातील मोबाइल फोन उत्पादनाला आणखी चालना देण्यासाठी ६२,५०० कोटी रुपयांच्या 'मोबाइल फोन मॅन्युफॅक्चरिंग स्कीम'लाही मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयांच्या (पान २ वर)

## अमेरिका-इराण युद्धाने घेतला १४ भारतीयांचा जीव

नवी दिल्ली दि. १५ : युद्ध थांबणार असे वाटत असतानाच पुन्हा भडका उडाला. अमेरिका आणि इराण एकमेकांवर हल्ले करत आहेत. पण, या हल्ल्यांमध्ये इतर देशांच्या नागरिकांचाही जीव जात आहे. २८ फेब्रुवारी रोजी हे युद्ध सुरू झाले. या दोन्ही देशामध्ये सुरू झालेल्या युद्धात आतापर्यंत १४ भारतीयांचा मृत्यू झाला आहे. २ भारतीय नागरिक बेपत्ता आहेत.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या संयुक्त अरब अमिरातीच्या (पान २ वर)













■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम